# फाशांचे मजेशीर खेळ

एका फाशावर सहा निरनिराळे आकार काढा. त्या प्रत्येक आकाराचे पुठ्ठ्याचे प्रत्येकी दहा तुकडे कापून एका पिशवीत ठेवा. फासा टाका आणि त्याच्या वरच्या बाजूला जो आकार असेल, त्या आकाराचा तुकडा तुम्ही पिशवीतून केवळ स्पर्शाच्या साहाय्याने शोधायचा आहे. जर तो बरोबर असेल, तर तो तुम्हाला मिळेल. हा खेळ आळीपाळीने खेळायचा आहे.





प्रत्येकाने या आकाराचे चार चौकोन चित्रात



दाखवल्याप्रमाणे काढायचे आहेत. आता फासा टाका. वरच्या बाजूला आलेला क्रमांक कोणत्याही एका चौकोनात लिहा. एकदा लिहिलेल्या आकड्याची जागा बदलता येणार नाही. सर्व चौकोनात आकडे येईपर्यंत फासा टाकत राहा. डावीकडचे आकडे उजवीकडच्या आकड्यांपेक्षा मोठे आहेत का? तसे असतील तर तुम्हाला एक गुण मिळाला. ज्याला सर्वप्रथम पाच गुण मिळतील तो जिंकेल.



या खेळासाठी तुम्हाला तीन फासे आणि तुमचे गुण मांडून ठेवण्यासाठी कागद-पेन्सिल घ्यावी लागेल. तिन्ही फासे एकदम टाका. तिन्ही फाशांच्या वरच्या बाजूला असलेल्या ठिपक्यांची बेरीज करा. ज्याचे सर्वप्रथम 100 गुण होतील, तो जिंकेल.

प्रत्येक खेळाडू दोन फासे दोनदा टाकेल. प्रत्येक वेळी वरच्या बाजूचे ठिपके मोजून आधी त्यांची बेरीज व मग त्या दोघांचा गुणाकार करेल. उत्तर बरोबर आले, तर एक गुण.
उदाहरणार्थ, **6 × 9 = 54.**



प्रत्येक राउंडनंतर ज्यांचे गुण सर्वाधिक असतील त्याला एक गुण मिळेल. ज्याचे 10 गुण सर्वप्रथम होतील, तो जिंकेल.



## फरक

तीन फासे घेऊन खेळताना मुले त्याचे नियम बदलून अथवा नवे नियम बनवूनही खेळू शकतील. तीन फासे एकदमच फेकल्यानंतर दोन मोठ्या आकड्यांची बेरीज करून त्यातून तिसऱ्या फाशावरील आकडा वजाही करू शकतील. ते त्यांचे गुण असेही म्हणता येईल. ज्याचे प्रथम 100 गुण होतील तो जिंकेल.

